पोलीस अधीक्षक, कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp. palghar@mahapolice.gmail.com

# प्रेसनोट क्र. ५३ दिनांक २७/०९/२०२२

# महामार्गावरील अपघात रोखणेकरीता पोलीस अधीक्षक यांनी घेतली नॅशनल हायवे ॲथोरीटी यांची बैठक

श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर होत असलेल्या अपघाताची गांभीर्याने दखल घेऊन होत असलेले अपघात रोखण्याकरीता दि.२६/०९/२०२२ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय पालघर याठिकाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI), महामार्ग देखरेख ठेकेदार व सार्वजनीक बांधकाम विभागाची एकत्रीतपणे बैठक बोलावण्यात आली होती.

सदर बैठकीमध्ये महामार्गावरील असलेल्या अपघात प्रवण (ब्लॅक स्पॉट) क्षेत्राबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर महामार्गावर पालघर जिल्ह्यात एकूण १५ अपघात प्रवण क्षेत्र (ब्लॅक स्पॉट) आहेत. सदर अपघात प्रवण क्षेत्र याठिकाणी होणारे अपघात टाळण्याकरीता सुचनाफलक लावणे, अनाधिकृत रोड कटींग बंद करणे, वाहनांचा वेग कमी करण्यासाठी रम्बलर स्ट्रीपस लावणे, रस्त्याच्या बाजूला वाहनधारकांना रस्त्याचा अंदाज येण्यासाठी कॅट आईज, डेलीनेटर्स, ब्लींकर्स, महामार्गावरील पडलेले खड्डे भरणे अशा उपाययोजना करण्याचे सुचविले आहे. नमूद उपाययोजना या तीन आठवड्याच्या आत पुर्ण करण्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) यांना आदेश देण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे महामार्गावर अपघात झाल्यानंतर जखमींना रुग्णालयात उपचाराकरीता घेवून जाण्याकरीता तात्काळ रुग्णवाहीका उपलब्ध होत नाही याकरीता महामार्गावरती एकूण वेगवेगळया चार ठिकाणी रुग्णवाहीका उपलब्ध करुन देणे. तसेच अपघातग्रस्त वाहने तात्काळ महामार्गावरुन बाजूला करण्यासाठी क्रेन उपलब्ध करुन देणे. त्याचप्रमाणे अग्नीशमक पथक हे जिल्हा रस्ता सुरक्षा समितीकडून एनआयए च्या माध्यमातून उपलब्ध करण्यात येणार आहे.